प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CIDCO WE MAKE CITIES    सिडको

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २७.०२.२०१९**

**सिडको तारा केंद्रातर्फे विमानतळ प्रकल्पबाधित तरुण-तरुणींकरिता विमानतळाशी संलग्न रोजगाराभिमुख अभ्यासक्रम**

सिडको तारा कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रातर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधित गावांमधील प्रकल्पबाधित उमेदवारांसाठी विविध रोजगाराभिमुख प्रशिक्षणात्मक अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून ते पूर्णत: निशु:ल्क आहेत. सदर अभ्यासक्रमांसाठी ०१ मार्च, २०१९ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असून पहिल्या टप्प्यात एअरलाईन रिझर्व्हेशन एजंट (Airline Reservation Agent), एअरलाईन कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह (Airline Customer Care Executive), एअरलाईन कार्गो एजन्ट (Airline Cargo Agent) या अभ्यासक्रमांचा समावेश असणार आहे.

सिडकोतर्फे सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग म्हणून सन २०१५ पासून सिडको तारा कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. या केंद्रातर्फे नवी मुंबई क्षेत्रातील प्रकल्पबाधित तरुण, महिला यांना नोकरी वा उद्योगांसाठी पूरक कौशल्ये विकसित करण्यासाठी विविध अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते. विशेषत: महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याबाबत सदर उपक्रम हा कमालीचा यशस्वी ठरला आहे.

उपरोक्त अभ्यासक्रमांना शासनाच्या नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि एरोस्पेस ॲण्ड एव्हिएशन सेक्टर स्कील कौन्सिल यांची मान्यता आहे. या अभ्यासक्रमांचा कालावधी ३ महिन्यांचा असून सदर प्रशिक्षण अभ्यासक्रम दि. ०१/०४/२०१९ पासून सुरू होणार आहेत. या अभ्यासक्रमांना मिळणार प्रतिसाद तसेच त्यांची व्यवहार्यता लक्षात घेऊन दहावी आणि बारावी उत्तीर्णांसाठी आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये अशा प्रकारचे साधारणत: १५ प्रशिक्षण अभ्यासक्रम राबविण्याचा सिडकोचा मानस आहे.

सदर अभ्यासक्रमांसंबंधी सविस्तर माहिती मिळविण्याकरिता सिडको तारा कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, टॉवर नं. ५, प्लॅटफॉर्म स्तर, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, नवी मुंबई- ४०० ६१४ या पत्त्यावर भेट द्यावी किंवा

०२२-६१०५ ४८००, ६१०५ ४८०१, ६१०५ ४८०७ अथवा ६१०५ ४४५५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. सदर प्रशिक्षण केंद्रामध्ये या अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश अर्ज कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत विनामुल्य देण्याची व्यवस्था सिडकोमार्फत केलेली आहे. प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दि.२०/०३/२०१९ रोजी पर्यंत सायं. ०५.३० वा. स्वीकारले जातील.

उपरोक्त अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना विमानतळ प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. यास्तव, प्रकल्पबाधित तरुण-तरुणींनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**